PEER REVIEWED &
INDEXED (SJIF) JOURNAL

ISSN : 2319-8648
Impact Factor : 7.139

# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL


॥ प्रदीपः सर्वविद्यानाम् ॥

**Maharashtra Philosophy Council
and
Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce
& M. H. Mehta Science College, Palghar**

Organized

## Maharashtra Philosophy Council 37th Conference

Date 1st & 2nd October 2021



Theme of Conference

# Contemporary Problems and Role of Philosophers

Philosophy of Dr. Amartya Sen || Philosophy of Modern Saint Vai. Sonopant Dandekar

Executive Editor
**Dr. Kiran Save**

Co-Editor
**Dr. Tanaji Pol**
**Lt. Anagha Padhye Deshmukh**

Chief Editor
**Mr. Arun B. Godam**

www.rjournals.co.in

| | | | |
|---|---|---|---|
| 19. | दर्शन: एक तौलनिक अभ्यास | डॉ. रेखा मारोतराव शेरकर | 92 |
| 20. | गांधीप्रणीत शैक्षणिक धोरण आणि त्याची प्रस्तुतता | अनघा अरुण पाध्ये | 95 |
| 21. | संशोधन विषयाची निवड व महत्त्व | प्रा. डॉ प्रभाकर रामलिंग कीर्तनकार | 100 |
| 22. | ग्रामगीतेतील जीवन–शिक्षण संदर्भातील विचार : एक चिंतन | डॉ. धनराज सुभाष हाडुळे | 102 |
| 23. | महात्मा गांधीचा 'स्त्री' विषयक दृष्टिकोन : चिकित्सक विश्लेषण | डॉ. शितल रुद्रमुनी येरुळे | 108 |
| 24. | अस्तित्ववादी तत्त्वज्ञ अल्बर्ट काम्यूचा मृत्युविषयक दृष्टिकोन | डॉ. रोहित सुधाकर गायकवाड | 113 |
| 25. | शं. वा. दांडेकर लिखित 'ईश्वरवाद' ग्रंथाचे तात्त्विक विवेचन | डॉ. दर्शना चौधरी | 116 |
| 26. | स्त्री सक्षमीकरण आणि वास्तव | प्रा. डॉ. बाजीराव माणिकराव पाटील | 120 |
| 27. | नालंदा विद्यापीठ संपन्न ज्ञानकेंद्राच्या पुनरुभारणीसाठी डॉ. अमर्त्य सेन यांचे योगदान | प्रा. डॉ. शीला गोडबोले पाईकराव | 124 |
| 28. | तत्त्वज्ञान विस्तारातील अडचणी | श्री. अनिल लक्ष्मणराव शिंदे | 128 |
| 29. | महात्मा गांधीजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या चळवळींचे तात्विक आधार | प्रा. संतोष भावार्थे | 130 |
| 30. | स्त्रियांच्या सामाजिक समस्या | प्रा. स्वामी सोनू मन्मथ | 134 |
| 31. | भारतीय शिक्षणप्रणाली आणि स्वामी विवेकानंद यांचे शिक्षणविषयक विचार | श्रीमती सुप्रिया प्रणय राऊत | 137 |

CURRENT GLOBAL REVIEWER
Special Issue 1 , Vol. II | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648
Oct. 2021 | SJIF Impact factor | Impact Factor : 7.139

# नालंदा विद्यापीठ संपन्न ज्ञानकेंद्राच्या पुनरुभारणीसाठी डॉ. अमर्त्य सेन यांचे योगदान

**प्रा. डॉ. शीला गोडबोले पाईकराव**
ग्रंथपाल, सोनोपंत दांडेकर आर्टस, व्हि. एस. आपटे वाणिज्य व एम. एच. मेहता विज्ञान महाविद्यालय, पालघर.

---

**प्रस्तावना:**

प्राचीन काळापासून भारत ज्ञानाचा स्त्रोत राहिले आहे. बौद्ध धर्माच्या उदय व विस्तारानंतर ज्ञानप्रसारालाही चालना मिळाली. त्या काळातील राजांनी बौद्ध धर्म तसेच जैन धर्माच्या मताना राजाश्रय दिल्यामुळे ज्ञानप्रसाराला आणखी चालना मिळाली. भारतीय लोकांमध्ये ज्ञानग्राहकता तर होतीच शिवाय तत्कालीन राजेही ज्ञानोपासक होते व विद्वानांना मदत, आश्रय व सन्मान करणारे होते. बुद्ध निर्वाणानंतर बुद्धांशी संबंधित स्थळांच्या प्रदेशात तसेच बौद्ध धर्माला राजाश्रय देऊन त्यांचे अनुयायी होऊन त्या—त्या परिसरातील राजांनी विविध विषयातील विद्वान व बौद्ध भिक्खूंना ज्ञान ग्रहण करण्यासाठी ज्ञानाचे आदान प्रदान करण्यासाठी अनेक बौद्ध मठांची निर्मिती केली. त्या ठिकाणी चर्चा, वादविवाद, ग्रंथलेखन, वाचनाद्वारे ती ज्ञानकेंद्रे व त्यामध्ये अध्ययन व अध्यापन करणारे हे दोन्ही घटक भारतीय समाजाच्या चौफेर विकासासाठी उपयुक्त ठरले. अनेक विद्वान विद्यार्थी व राजाश्रय देऊन अर्थसाहाय्य तक्षशिला, विक्रमशिला व नालंदा ही जागतिक स्तरावरील प्राचीन ज्ञानकेंद्रे उदयाला आली व त्यांच्या माध्यमातून भारतातील प्राचीन तत्त्वज्ञानाचा परिचय जागतिक समुदायाला झाला.

**नालंदा विद्यापीठ:**

प्राचीन काळातील जगातील पहिले सर्वात मोठे ज्ञानकेंद्र म्हणून नालंदा विद्यापीठाची नोंद आहे. प्राधान्याने या विद्यापीठात बौद्ध तत्त्वज्ञान, गणित, तर्कशास्त्र, खगोलशास्त्र, ज्योतिष व्याकरण, चित्रकला, शिल्पशास्त्र, मंत्रविद्या, दंडनिती, न्यायशास्त्र, योगशास्त्र, मानव्य औषध उपचारशास्त्र, आरोग्यशास्त्र, वेद, शब्दविद्या अशा विविध विषयांचे शिक्षण दिले जात असे.

**नालंदा विद्यापीठ स्थापना व पार्श्वभुमी :**

बौद्ध धर्माच्या झपाट्याने होत असलेल्या विस्तारामुळे व तत्कालीन राज्यकर्त्यांच्या राजाश्रयामुळे बौद्ध धर्ममतावलंबी ज्ञानाचा प्रसारही वेगाने होऊ लागला. सम्राट अशोकाच्या बौद्धमत अनुयायीत्त्वामुळे त्याला आणखीनच गती मिळाली. नालंदा हे ठिकाण जैन व बौद्ध दोन्ही धर्मीयासाठी ऐतिहासिक व पवित्र स्थळ होते. वर्धमान महावीर व भगवान बुद्धाच्या अधिवासाने या स्थळांना ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले. जैनमतानुसार महाविरांचा जन्म ही नालंदाच्या परिसरातीलच तर भगवान बुद्धाच्या प्रमुख शिष्यापैकी सारीपुत्र व मोग्गलायन याचांही जन्म याच परीसरातील त्यामुळे या भुमीला ऐतिहासिक महत्त्व आहे. आणि त्यामुळेच प्रथम सम्राट अशोकाने इथे विहार स्थापिले. पुढे या स्थळाच्या ठिकाणी खोदकाम सुरू असताना कुमारगुप्त (सम्राट)चे एक नाणे सापडले त्यामुळे हे विद्यापीठ गुप्त सम्राट समुद्रगुप्त व कुमारगुप्त यांनी बनविले अशा नोंदी आढळतात. याशिवाय कन्नोजचा सम्राट हर्षवर्धन यानेही या विद्यापीठाच्या विकासासाठी मोठ्य प्रमाणात अर्थसहाय्य केले याचीही नोंद सापडते. इ. स. पूर्व पाचव्या शतकात स्थापना झालेल्या

नालंदा विद्यापीठामध्ये इ. स. पूर्व १२ व्या शतकापर्यंत ज्ञानदानाचे कार्य सुरू होते. अन्य सम्राटामध्ये आपआपल्या कालखंडामध्ये यशोबर्मन,धर्मपाल, देवपाल तसेच श्रीविजय बलदेवपुत्र या राजद्यानी विद्यापीठाला अर्थसहाय्य करून भरभराटीला आणले व ज्ञानक्षेत्राच्या उच्च शिखराला पोहचविले.

या विद्यापीठात प्रवेश घेण्यासाठीची प्रवेशपरीक्षा कठीण असल्यामुळे ज्ञानपिपासु विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळत असे. भारतीय प्रदेशातील विद्यार्थ्यांसोबतच तेथे अन्य देशातून अनेक विद्यार्थी ज्ञानार्जन करण्यासाठी येत असत. विद्यापीठ कसे ज्ञानकेंद्री होते यासंदर्भातील संपूर्ण वर्णन या विद्यापीठात इ. स. पूर्व ६३७ मध्ये आलेल्या चीनी प्रवासी विद्यार्थी व अध्यापकाने लिहून ठेवले आहे. बौद्ध तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून त्याच ठिकाणी युआन श्वॉगने अध्यापनाचे कार्य केले. या विद्यापीठात उच्चशिक्षण घेऊन प्रस्तुत विषयात पारंगत होण्यासाठी तिबेट, चीन, जपान, कोरिया, कंबोडीया, ब्रम्हदेश, श्रीलंका, ईरान, मंगोलिया, टर्की, दक्षिण पूर्व आफ्रिका.

**नालंदा विद्यापीठ: रचना व स्थिती:**

प्राचीन भारतातील आदर्श विद्यापीठ बिहार राज्यातील राजगीरच्या उत्तरेला ११ किमी. वर हे विद्यापीठ होते. हे विद्यापीठ आशियाई देशासाठी प्रमुख ज्ञानाचा उच्च ज्ञानाचा स्त्रोत प्रमुख स्त्रोत होते. एकाचवेळी येथे १० हजार विद्यार्थी उच्च शिक्षण घेत असत. त्यासाठी २ हजार शिक्षकही होते. प्रत्येक शिक्षक आपआपल्या विषयांचे तज्ञ समजले जात. ज्याकाळात युआन श्वॉग विद्यापीठात होता त्यावेळी शिलभद्र हे प्रधानशिक्षक (कुलगुरू)होते. त्यांच्यासमवेत नागार्जुन, पद्मसंभव, शांतरक्षित, दीपकर, बुद्धकिर्ती, कर्णमती, कमलशील, स्थिरमनी, गुणमती आर्यदेव यांच्यासारखे विद्वान आचार्य होते.

विद्यापीठाचा परिसर पसरलेला तर इमारती भव्यदिव्य उभारण्यात आल्या होत्या. विद्यार्थ्यांसाठी वर्गखोल्यांसमवेतच निवासाचीही विशेष सोय होती. विद्यापीठाची मुख्य इमारत, प्रशासकीय इमारती तसेच आचार्यांयाठीही निवासाची सोय करण्यात आली होती. मुख्य इमारत सात मजली होती. यावरून तत्कालिन विद्यापीठाची भव्यदिव्यता लक्षात येईल. दररोज शंभरच्यावरती व्याख्याने होतं त्यासाठी व्याख्यान कक्ष भव्यदिव्य उभारलेले होते. विद्यार्थी व आचार्यासांठी ४ हजार खोल्या व १ हजार वर्गखोल्या होत्या. विद्यार्थी व आचार्यांची निवास व भोजनाची व्यवस्था मोफत केली जात असे.

**नालंदा विद्यापीठाचे ग्रंथालय:**

प्राचीन काळापासून ग्रंथ व ग्रंथ निर्माण करणाऱ्या विद्वान, व्यासंगी आचार्य ग्रंथकर्त्यामुळे मानवी समुदाय अधिक प्रगत, सामाजिक, उदार, शांतप्रिय, परोपकारी, सहिष्णु होण्यासाठी मोलाची मदत झाली आहे. कोणत्याही शैक्षणिक केंद्राचा सर्वात महत्त्वाचा केंद्रबिंदू असतो त्यांचे ग्रंथालय नालंदा विद्यापीठाचे ग्रंथालय अत्यंत भव्यदिव्य स्वरूपाचे होते. विविध ज्ञानशाखांचे वाचनसाहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे एव्हढेच ग्रंथालयाचे काम नव्हते तर संशोधनाच्या विविध टप्प्यावर आचार्य व विद्यार्थ्यांना आवश्यक संदर्भ उपलब्ध करून देणे हेही ग्रंथालयाचे कार्य होते. विद्यापीठासमवेतच ग्रंथालयाने ७०० वर्षे ज्ञानसंचय करून ते अध्यापनाच्याद्वारे समाजाला देण्याचा प्रदीर्घ प्रयत्न केला. ग्रंथालयाच्या तीन भव्यदिव्य इमारती होत्या, त्या रत्नोदधि, रत्नसागर व रत्नरंजक या नावाने स्थापित केल्या होत्या. या ग्रंथालयाच्या ग्रंथपालाचे नियंत्रण एकाच ठिकाणावरून होईल अशी रचना ग्रंथालय इमारतींची करण्यात आली होती. प्रचंड

प्रमाणात ग्रंथसाहित्य होते. ग्रंथालयातील संपन्न ग्रंथसाठा वर्धन सुरूच असे. नवनवीन ग्रंथाची निर्मिती होत असे. पाली, संस्कृत अशा भाषांमध्ये ग्रंथसाठा जपुन ठेवला जाई व विद्यार्थ्यांना वापरास देण्यात येई. सुसज्ज ग्रंथालय, चारित्र्यसंपन्न, व्यासंगी, बुद्धिमान आचार्य व गुणग्राहक कुशाग्र विद्यार्थ्यांमुळे या विद्यापीठाचा लौकिक पूर्ण आशियाई देशांमध्ये पसरला. ग्रंथालयाचा प्रचंड वाचनसाठा व ग्रंथनिर्मितीमधील सातत्यामुळे विद्यार्थी, संशोधक व आचार्यांच्या ज्ञानात वेगाने ज्ञानवर्धन होत असे. असे नोंद करण्यात आले आहे की, ग्रंथालय एव्हढे प्रचंड मोठे होते की जेंव्हा खिलजीने हे जाळले तेंव्हा या ग्रंथालयातील ग्रंथसाठा तीन महीने जळत होता. यावरून हे ग्रंथालय किती भव्यदिव्य व ग्रंथसाठा किती संपन्न होता याची कल्पना येते.

**प्राचीन नालंदा विद्यापीठाची अवनती:**

बख्तीयार खिलजीने विद्यापीठाच्या इमारती जाळून टाकल्या. इमारती भव्य उंच असल्यामुळे तो किल्ला समजून त्याने त्या नष्ट केल्या तर ते मंदिर समजून त्यांने ते नष्ट केले असे काही इतिहासकारांचे मत आहे. पुढे शंकराचार्यांच्या उदयानंतर वैदिक धर्माचा प्रसार वेगाने झाल्यामुळे बौद्धधर्माला मिळत असलेला राजाश्रय कमी होत गेला. तसेच विविध कारणामुळे विद्यार्थ्यांची, आचार्यांची संख्या कमी झाली. मात्र आठ शतके या विद्यापीठाने जगाला प्रतिभावंत, विचारवंत व विविध विषयावरील प्रज्ञावंत समाजाला दिले. भारतीय समाज, भारतीय संस्कृती, भारतीय अध्ययन, विविध शास्त्र दर्शन अध्यापन पद्धती, भारतीय लोकांच्या वर्तनातील न्याय, नीती, निर्माणाचे खूप मोठे कार्य विद्यापीठाने केले. आजही विद्यापीठाचे अवशेष दृष्टिरूपात असून त्याला आंतरराष्ट्रीय ऐतिहासिक ठेवा म्हणून 'युनायटेड नेशन्स'ने मान्यता दिली आहे. हे विद्यापीठ भारताची जगाला एक अनमोल भेट म्हणावी लागेल.

**नालंदा विद्यापीठ पुनर्निर्माण:**

भारताचा हा अनमोल ठेवा त्याचे पुनर्निर्माण करण्याची गरज भारताचे तत्त्कालीन राष्ट्रपती दि. डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम यांनी बोलून दाखविली व त्यानंतर विद्यापीठाच्या पुनर्निर्माण प्रक्रियेला गती मिळाली. बिहार सरकार, भारत सरकार तसेच चीन, जपान, कोरीया, सिंगापूर आदि बौद्ध राष्ट्रांनी भरीव आर्थिक मदत करून पून्हा त्याच परीसरात नालंदा विद्यापीठाची उभारणी सुरू झाली.

**डॉ. अर्मत्य सेन यांचे योगदान:**

डॉ. सेन म्हणजे भारतीयांसाठी अत्यंत आदराचे स्थान प्राप्त असलेले नि:स्पृह अर्थतज्ज्ञ. त्यांना मिळालेल्या अर्थशास्त्राच्या नोबेल पारितोषिकामुळे भारतीयांना आणखीणच त्यांचा अभिमान वाटला. आंतराष्ट्रीय किर्तीचे अर्थतज्ज्ञ म्हणून जगात त्यांची ख्याती आहे. प्रखर बुद्धिवादी, विज्ञानवादी, वास्तववादी व वंचित समुहांच्या दारिद्र्यच्या कारणांचा शोध घेवून समाजकल्याणकारी अर्थशास्त्र तसेच विकास घडण्याच्या प्रक्रियेचा त्यांनी सखोल अभ्यास केला. दारिद्र्यनिर्मुलन, बेरोजगारी निर्मुलन, भांडवलदाराचे सामाजिक दुष्परिणाम अशा अनेक विषयांवर त्यांनी संशोधन केलं. त्यांच्या संशोधनाचा फायदा अनेक देशांना नितीधोरणे आखण्यासाठी झाला. भारताच्या गरिबीचे निमुर्लन तसेच कृत्रिम महागाई वर त्यांनी अनेक उपाय सुचविले.

आरोग्यसेवा व शिक्षणव्यवस्था यावर भारतासारख्या देशांनी अधिक भर द्यावा असा त्यांचा आग्रह असतो. 'Homein the world या त्यांच्या आत्मकथनातून त्यांच्या व्यक्तीमत्व, विचार व कार्याचे विविध पैलु दृष्टीस पडतात. दुष्काळ व गरिबीचा

परस्परसबंध शोधुन सेन यांनी त्यांच्या Entitlement and Deprivation या महत्त्वपुर्ण संशोधपर लेखात अत्यंत महत्त्वाचा सिध्दांत मांडला जो भारतीय समाजासाठी तंतोतंत लागु पडतो. ''भुकेचा प्रश्न निर्माण होण्यामागे धान्यटचांई नसुन त्यासाठी असमान वितरणव्यवस्था आहे असा त्यांनी निष्कर्ष काढला.

अशा प्रज्ञावंत अर्थतज्ञाची नेमणूक भारत सरकारने नालंदा विद्यापीठाचे पहीले कुलगुरू म्हणुन केली. नालंदा विद्यापीठाच्या पुनरुभारणीसाठी कुलगुरू म्हणून डॉ. सेन या जागतिक किर्तीच्या अर्थतज्ञाने स्विकार्यता देणे ही खुप महत्त्वाची गोष्ट होती. २००६ पासुन विद्यापीठाच्या पूनर्निर्माणाला सेन यांच्या नेतृत्वाखाली सुरूवात झाली. विद्यापीठात इतिहास, भाषा, भाषाशास्त्र, धर्मशास्त्र, नितीशास्त्र, परराष्ट्र सबंध, यासोबतच आधुनिक युगाचे व्यवस्थापनशास्त्र, पर्यावरण, विज्ञान व तंत्रज्ञान विकास, समाजमुल्यात्मक शास्त्रे. तसेच प्राचीन नालंदा विद्यापीठाच्या शैक्षणिक मुल्य व नितीचा विचार करून विज्ञानवारी मुल्यांवर आधारीत अभ्यासक्रम राबविण्याची योजना डॉ. सेन यांनी आखली. बौध्द तत्त्वज्ञान व मानवी केंद्रीत शिक्षण प्रणालीला केद्रंस्थानी मानुन बौध्द देशांचा सहभाग घेऊन विद्यापीठाच्या विकासासाठी त्यांनी रोडमॅप तयार केला व त्या दिशेने प्रयत्न केले त्यामुळे १ sept. २०१४ या दिवशी अभ्यासक्रम अध्ययन अध्यापनाला सुरूवातझाली. या विद्यापीठात उच्च शिक्षण घेतलेले विद्यार्थी भारत व जगभरात मानव कल्याण्यासाठी आवश्यक संशोधन करून समाज अधिक नीतीमान व विकसित करण्याचा प्रयत्न करतील हेच डॉ. सेन यांचे स्वप्न आहे.

**निष्कर्ष:**

प्राचीन नालंदा विद्यापीठाने भारत व जागतिक मानवी समुदायाच्या समुच्चय विकसनासाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका निवडली आहे. विद्यापीठाच्या पूनर्निर्माणासाठी डॉ. अमर्त्य सेन यांचे अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान आहे.

**सदंर्भ:**

१) रामावतार शुक्र, (१९७४),फाहियान और युऑनशॉग की भारत यात्रा, हिरी ग्रंथ प्रसारक समिती खिन्द्वाडा (१ ते १८६)
२) नालंदा (m.bharatdiscovery.org)
३) खोडवे अच्युत, नालंदा विद्यापीठ, मुळ स्त्रोत – मराठी विश्वकोष.
४ ) तळवलकर गोविंद, (२०११), नालंदा विद्यापीठाचा नवा अवतार, साप्ताहिक साधना.
५) इतिहास के आयने मे दैनिक जागरण (m.jagran.com)(१ Sept. २०१४)
६) Sing Shivani ,(२०२१) Nalanda, ISBN ९३९०९२११२१ १-३९८ Analysis Publication.
७)Nair Suresh, (२०१५), The Last Disciple of Nalanda, ISBN ९७८९३८२५३६५२९, (P.१-३४०), Lifi Publication.
८ Beal Samuel, (२०१३), The Life of Hillen, T sing, Rupa Publications India, ISBN ९७८८१२९१२०३११.